महाराष्ट्र शासन
**वनसंरक्षक (प्रादेशिक), अमरावती**
कार्यालयीन दूरध्वनी 2662090 / 2662593/ 2662680 (वैयक्तिक), फॅक्स- 2663314
**जि. प. कार्यालयाचे बाजूला,कॅम्प, अमरावती - 444 602**
ई-मेल-पत्ता- ccftamravati@mahaforest.gov.in / aticcfa@gmail.com

पत्र/ई-मेलव्दारे

**क्रमांक/कक्ष-4/जमीन/FCA-1980/प्र.क्र.10/01/646 /2022-23** **अमरावती, दिनांक :- 04/ 11 / 2022**

**प्रति,**

**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा**
**केंद्रस्थ अधिकारी, म.रा.नागपूर**

विषय :- **वनजमिन अकोला-**
**वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत मौजे मोझरी ता.बार्शिटाकळी जि.अकोला येथील श्री.मधुकर शेवला राठोड व इतर 9 यांचे शेतात सिंचनाकरीता पाईप लाईन व ईलेक्ट्रीक लाईन टाकणे बाबतचे 0.32 हेक्टर वनजमिन वळतीकरणाचे प्रस्ताव.**

**संदर्भ :-**
1. आपले कार्यालयीन पत्र क्रमांक कक्ष-17/नोडल/अमरावती/आयडी क्र.-13189/1191, दिनांक 10/08/2022.
2. उपवनसंरक्षक (प्रा), अकोला यांचेकडील पत्र क्रमांक कक्ष-1/सर्व्हे/934, दिनांक 02/11/2022

वन (संवर्धन) अधिनियम, 1980 अंतर्गत मौजे मोझरी ता.बार्शिटाकळी जि.अकोला येथील श्री.मधुकर शेवला राठोड व इतर 9 यांचे शेतात सिंचनाकरीता पाईप लाईन व ईलेक्ट्रीक लाईन टाकणे बाबतचे 0.32 हेक्टर वनजमिन वळतीकरणाचे प्रस्तावामध्ये आपणाकडील संदर्भिय क्रमांक 1 अन्वये 2 त्रुटी उपस्थित करुन, पूर्तता अहवाल सादर करणेबाबत या कार्यालयास कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने उपवनसंरक्षक (प्रा) अकोला यांचेकडून संदर्भिय क्रमांक 2 वरील पत्रान्वये 02 त्रुटीवर पूर्तता अहवाल या कार्यालयास प्राप्त झाला आहे. सदर प्राप्त अटी पूर्तता अहवालाशी हे कार्यालय सहमत असून पुढील कार्यवाहीकरीता यासोबत सहपत्रित करुन सादर करण्यात येत आहे.

**सहपत्र : वरील प्रमाणे.**

**(जी. के. अनारसे)**
**वनसंरक्षक (प्रादेशिक) अमरावती**

**प्रतिलिपी -** उपवनसंरक्षक (प्रादेशिक), अकोला वनविभाग, अकोला यांना माहिती करीता अग्रेषित.
**प्रतिलिपी -** श्री.मधुकर शेवला राठोड व इतर 9 रा.मोझरी ता.बार्शिटाकळी जि.अकोला यांना माहितीकरीता अग्रेषित.

वनसंरक्षक (प्रा.) अमरावती यांचे कार्यालय
आवक क्रमांक 6611
- 4 NOV 2022
जमीन
शाखा ........ प्रशासकिय अधिकारी वनसंरक्षक (प्रादे.)

# उपवनसंरक्षक (प्रा.) अकोला वन विभाग, अकोला यांचे कार्यालय,

वसुंधरा हॉल, मंगरूळपीर रोड, अशोक वाटीका समोर, अकोला-444001
दुरध्वनी क्र. 0724-2415600 ई-मेल dycfakola@mahaforest.gov.in

क्रमांक .कक्ष-1/सर्व्हे/934/2022-23 अकोला, दिनांक 02/11/2022

प्रति,
वनसंरक्षक (प्रादे.)
अमरावती

**विषय** :-वनजमिन-अकोला
वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत मौजे मोझरी ता. बार्शिटाकळी जि. अकोला येथील श्री मधुकर शेवला राठोड व इतर 9 यांचे शेतात सिंचनाकरीता पाईप लाईन व ईलेक्ट्रीक लाईन टाकणे बाबतचे 0.32 हेक्टर वनजमिन वळतीकरणाचे प्रस्ताव.

**संदर्भ** :- 1. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी ,म.रा.नागपुर यांचेकडील पत्र क्र. कक्ष-17 /नोडल/अमरावती/आयडी-13189/1191, दि. 10/08/2022
2. वनसंरक्षक (प्रा.) अमरावती यांचे कडील पत्र क्र. कक्ष-4/जमिन/1577 दि.23/08/2022
3. या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-1/सर्व्हे/1418 दिनांक 12/09/2022
4. श्री. मधुकर शेवला राठोड व इतर 9 यांचा दिनांक 02/11/2022 रोजीचा पुर्तता अहवाल.

संदर्भीय पत्र क्र. १ अन्वये वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत मौजे मोझरी ता. बार्शिटाकळी जि. अकोला येथील श्री मधुकर शेवला राठोड व इतर 9 यांचे शेतात सिंचनाकरीता पाईप लाईन व ईलेक्ट्रीक लाईन टाकणे बाबतचे 0.32 हेक्टर वनजमिन वळतीकरणाचे प्रस्तावात खालील प्रमाणे त्रुटी कळविल्या होत्या सदर त्रुटींचा अहवाल पकल्प यंत्रणेने संदर्भ क्र. 4 अन्वये कार्यालयास सादर केला आहे.

| अ.क्र. | त्रुटी | पुर्तता |
|---|---|---|
| १ | प्रकल्प यंत्रणेने ३ मी. रूंदीची ईलेक्ट्रीक लाईन टाकणे करीता प्रस्ताव वन (संवर्धन) अधिनियम 1980 अंतर्गत या कार्यालयास सादर केलेला आहे. परंतु सदरील ऐवढया रूंदीकरीता इलेक्ट्रीक लाईन व सिंचना करीता प्रस्तावाची आवश्यकता आहे का? याची खात्री करण्यात यावी. तसेच त्याबाबत आपले स्वयं:स्पष्ट अभिप्राय सादर करण्यात यावा. | प्रकल्प यंत्रणेने कळविले नुसार १० शेतकऱ्यांचे शेतात वेगवेगळी पाईप लाईन टाकणे असल्याने प्रकल्प यंत्रणेस १ मी. रूंदीत व ८०० मी. लांबीत पाईप लाईन टाकणे करीता एकुण ०.०८ हे. व १० ही शेतकऱ्यांच्या इलेक्ट्रीक मशीन बसविणे करीता ११ के.व्ही. ईलेक्ट्रीक डीपी करीता ३ मी. रूंदीत व ८०० मी. लाबीत एकुण ०.२४ हे. आर असे एकुण ०.३२ हे.आर क्षेत्राची आवश्यकता असले बाबत कळविले आहे. तसेच Forest (Conservation) Act] १९८० and Forest conservation Rules, २००३ (Guidelines & Clarifications) मधील Chapter-१० मध्ये दिलेल्या सुचने नुसार ७ मी. रूंदी असने आवश्यक आहे. परंतु सदर प्रकल्प यंत्रणा ईलेक्ट्रीक लाईन केबल जमिनीमधुन टाकुण नेत असल्याने त्यांना भविष्यात काही अडचण निर्माण होणार नाही या करीता प्रकल्प यंत्रणेने ३ मी. रूंदीची मागणी केलेली आहे. त्यामुळे त्यांनी मागणी केलेले ०.३२ हे.आर क्षेत्र मंजुर करण्यास हरकत नाही. सोबत प्रकल्प यंत्रणेने सादर केलेला अहवाल सहपत्रीत केला आहे. |
| २ | सदर प्रस्ताव site specific आहे का? याबाबत आपले अभिप्राय सादर करण्यात यावे. | होय,<br>शेतकऱ्यांचे शेताचे दुसऱ्या बाजुस तलाव असुन मध्ये वनक्षेत्र आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांचे शेतीचे सिंचनाकरीता लागणारे पाणी वनक्षेत्रातुनच नेल्या शिवाय पर्याय नसल्याने सदर प्रस्तावात नमुद site specific आहे. |

सहपत्र :- वरील प्रमाणे

(अर्जुना के.आर) भा.व.से.
उपवनसंरक्षक (प्रा.)
अकोला वन विभाग, अकोला

प्रतिलिपी :- श्री. मधुकर शेवला रोठोड व इतर 9 यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस रवाना.

उप-वनसंरक्षक, अकोला यांचे कार्यालय
आवक क्रमांक 2024
दिनांक 02.11.2022

कार्यालय
उपवनसंरक्षक, अकोला वन विभाग
कक्ष
2 NOV 2022
उवसं अकोला
O.S./मु.ले.

प्रति,

मा. उपवनसंरक्षक (प्रा.)
अकोला वनविभाग, अकोला

**विषय : इलेक्ट्रीक लाईन टाकणे करीता ३ मीटर रूंदीची आवश्यकते बाबत.**

**संदर्भ : आपले पत्र क्र. १४१८/२०२२ दि. १२/०९/२०२२**

महोदय,

आपणांस विनंती पुर्वक कळवित आहो की, वनसंवर्धन अधिनियम १९८० अंतर्गत मौजे मोझरी/घोटा येथील शेतकरी मधुकर शेवला राठोड व इतर ९ यांच्या शेतामध्ये पाईप लाईन व इलेक्ट्रीक लाईन टाकण्याकरीता वन विभागामधुन ०.३२ हे. जमीन वळती करण्याकरीता प्रस्ताव दिला आहे.

आम्ही सर्व शेतकरी एकुण १० यांचे शेत वनविभागाच्या क्षेत्राबाहेर निघाल्यावर सर्वांची शेती वेगवेगळया ठिकाणी आहे. त्यामुळे सर्व १० शेतकऱ्यांना वेगवेगळी पाईप लाईन टाकणे गरजेचे आहे. १ मीटर रूंदी व ८०० मीटर लांबीमध्ये १० पाईप लाईन वेगवेगळी टाकणार आहे. शेती वेगवेगळया ठिकाणी असल्यामुळे भविष्यात शेतकऱ्यांमध्ये वाद निर्माण होउ नये, म्हणुन वेगळी पाईप लाईन टाकणे गरजेचे आहे.

एकुण १० शेतकऱ्यांकरीता वेगवेगळी इलेक्ट्रीक विद्युत पंप बसवित असल्यामुळे सर्वांकरीता ११ के.व्ही. विद्युत वाहीणी टाकणे व डि. पी. लावणे आवश्यक आहे. विद्युत वाहीणी व पाईप लाईन यामध्ये अंतर ठेवणे गरजेचे आहे, अंतर ठेवले नाही तर शॉर्ट सर्किट होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

आपणांस विनंती करण्यात येत आहे की, पाईप लाईन व इलेक्ट्रीक लाईन वेगवेगळी टाकत असल्यामुळे एकुण ४ मीटर रूंदी व ८०० मीटर लांबी एकुण क्षेत्रफळ ०.३२ हे. ची आवश्यकता आहे. करीता ०.३२ हे. वनजमीन वळती करण्यात यावी, त्याकरीता सरकारी नियमानुसार येणारा नुकसान भरपाई खर्च आम्ही सर्व भरण्यास तयार आहे.

हि विनंती.

आपला विश्वासु

मधुकर शेवला राठोड
(मधुकर शेवला राठोड व इतर ९)
रा. मोझरी/घोटा ता. बार्शिटाकळी जि. अकोला